संच : ब

# ५ वी मराठी

## महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे-३०.
## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र
## शैक्षणिक प्रगती चाचणी
## पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - पाचवी
## विषय : मराठी (लेखी)

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ______ **शिक्षकाची स्वाक्षरी** ______ **एकूण गुण :** ४०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) __________ २) __________

३) __________ ४) __________

५) __________ ६) __________

७) __________ ८) __________

९) __________ १०) __________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

> ''दादाले सांगना ओ माय, माले पाचवीमा जावू द्या... शिकू द्या.'' असं म्हणत स्नेहा पुन्हा रडायला लागली. सुलभाला गहिवरून आलं. तिचे डोळे पाणावले. नवऱ्याला कसं समजावून सांगावं हेच तिला समजेना.
>
> गावात चौथीपर्यंत शाळा होती, म्हणून गावातील बरेच लोक मुलांना चौथीपर्यंत शिकवत होते. गरिबीमुळे मुलीला परगावी शिकवणं सखारामला अवघड वाटत होतं. सखारामच्या भाऊबंदांमध्ये पोरींना कुणीही चौथीच्या पुढे परगावी पाठवून शिकवलं नव्हतं. त्यामुळे तोही त्यांचांच कित्ता गिरवणार होता. त्याचा निर्णय पक्का होता.
>
> स्नेहाच्या वर्गामधील बबली गावच्या सरपंचांची मुलगी होती. आडगावला जाऊन सरपंचांनी पाचव्या इयत्तेत बबलीला प्रवेश घेतला होता. स्नेहाला तिचे बाबा पुढे शिकवणार नाहीत, असं मुख्याध्यापकांना समजलं. सरपंचांना बरोबर घेऊन ते सखारामच्या घरी आले.

**प्रश्न २.** सरपंचांच्या मुलीचे नाव काय होते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) स्नेहा    ब) बबली    क) राधा

**प्रश्न ३.** सखाराम कोणत्या कारणामुळे स्नेहाला पुढील शिक्षणास पाटवत नव्हता. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) मुलांनी शिकणे त्याला पसंत नव्हते म्हणून.

ब) नातेवाईक पाठवत नव्हते म्हणून.

क) गरिबीमुळे व गावात शाळा नसल्यामुळे.

**प्रश्न ४.** 'स्नेहाला शिकण्याची इच्छा होती' हे उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून समजले ते लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७ साठी :** ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

### हे कोण गे आई?

नदीच्या शेजारीं । गडाच्या खिंडारीं
झाडांच्या ओळींत । वेळूंच्या जाळींत
दिवसा दुपारीं । जांभळी अंधारी
मोडकें देऊळ । त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायी। राहतें गे आई? ।।१।।

चिंचांच्या शेंड्यांना । वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी । कोण गे पालवी?
कोण गे जोरानें। मोठ्यानें मोठ्यानें
शीळ गे वाजवी? पांखरां लाजवी?
सारखी किति वेळ । ऐकूं ये ती शीळ? ।।२।।

(भा. रा. तांबे)

**प्रश्न ५.** पाखरांसारखी शीळ कोण वाजवत आहे? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) वारा ब) नदी क) मुलगा

**प्रश्न ६.** कवितेत कोणकोणत्या झाडांची नावे आलेली आहेत? (गुण २)

---

---

**प्रश्न ७.** 'कोण गे जोराने । मोठ्याने मोठ्यानें
शीळ गे वाजवी । पाखरां लाजवी?
वरील ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही. (गुण २)

---

---

---



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ*

**संच : ब**

**प्रश्न ८ ते १० साठी :** खालील जाहिरात वाच. त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

## खुशखबर! खुशखबर!! खुशखबर!!!

**'धमाल ग्रुप' पुणे आयोजित बालसाहित्य जत्रा**

### काय पहाल व काय घ्याल?

१) बालकथा संग्रह
२) कविता संग्रह
३) बालनाट्य
४) एकांकिका संग्रह
५) नाट्यछटा व विनोदी पुस्तके
६) चित्रकला, हस्तकला संबंधी पुस्तके

**सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य!**

- प्रत्येक पुस्तकावर ५०% ची घसघशीत सूट
- बालकांसाठी निबंध लेखन, काव्यलेखन, चित्रकला स्पर्धा
- विजेत्यांना नामांकित लेखकांच्या हस्ते आकर्षक पुस्तकभेट!

- **'बालसाहित्य जत्रा' कालावधी : दि. १० जून ते १३ जून २०१७**
- **वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५**
- **स्थळ : महात्मा फुले सांस्कृतिक भवन, पुणे.**

**प्रश्न ८.** स्पर्धेतील विजेत्यांना कोणते बक्षीस मिळणार आहे? (गुण १)

अ) वस्तू     ब) पुस्तक     क) रोख रक्कम

**प्रश्न ९.** बालसाहित्य जत्रेतील पुस्तक खरेदी करणे फायद्याचे ठरेल का? (गुण २)
हे तुला कशावरून समजले?

________________________________________

________________________________________

**प्रश्न १०.** इयत्ता ५वी मधील लीलाच्या आजोबांना या 'बालसाहित्य जत्रेसाठी' जाता येईल का?
हे तुला कोणत्या वाक्यावरून समजले? (गुण २)

________________________________________

________________________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ११ ते १३** मध्ये दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील शब्द वापर. आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही.

**प्रश्न ११.** सतीशने आंबा खाल्ला. (संत्री) (गुण १)

**प्रश्न १२.** मारियाकडे वह्या होत्या. (वही) (गुण १)

**प्रश्न १३.** आई-बाबा उद्या गावाला जातील. (काल) (गुण १)

**प्रश्न १४.** 'पाय लटलट कापणे' या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य लिही. (गुण १)

**प्रश्न १५.** खालील शब्दांना उपसर्ग जोडून तयार होणारा प्रत्येकी एक शब्द लिही.

जसे : पूर्ण - अपूर्ण (गुण १)

१) मान :

२) कुमार :

**प्रश्न १६.** खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

काय गं लीला नदी तुझ्याशी बोलते.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १७.** खालील वाक्यांचा योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिही. (गुण २)

सरपंचांनी बातमीवर फार विचार केला.

गावातील लोक दुष्काळाने चिंताग्रस्त होते.

सरपंचांनी लोकसहभागातून गावचा पाणी प्रश्न सोडवला.

गावातील सगळे लोक एकत्र येऊन कामाला लागले.

दूरदर्शनवर 'पाणी फाऊंडेशन' विषयी मोठी बातमी

**प्रश्न १८.** 'फळ' या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लक्षात घेऊन प्रत्येक अर्थाचे एक वाक्य लिही. (गुण २)

जसे : पाट – नानी पाटावर बसली. (अर्थ : पाट – बसण्यासाठीचा पाट)

पाट – शेताला पाटाने पाणी देतात. (अर्थ : पाट – शेतातील पाणी वाहण्यासाठीचा मार्ग)

## संच : ब

**प्रश्न १९.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही. (गुण ५)

आज चिनू फार आनंदात होती. आजीचा फोन आला आहे. आजी आज बऱ्याच दिवसानंतर गावाहून येणार होती आजीचा फोन आला तेव्हा आई कामात होती आणि बाबाही कामाला निघून गेले होते चिनूने विचार केला........



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २०.** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

पाणी, दुष्काळ, बचत, झाडे,

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th - B \Proof-II\19-06-17\GJ*